महाराष्ट्र शासन
**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर.**
नवीन प्रशासकीय इमारत, गांधी नगर, सोलापूर - ४१३ ००३.
**दुरध्वनी क्र.०२१७-२७४४६१३ फॅक्स क्र. ०२१७-२७४४६१८**
**Email Id- cp.solapur@mahapolice.gov.in**

जा.क्र.आस्था-कक्ष २(४)/पो.भ.२४-२५/नियुक्ती/२०२६/ 2538 सोलापूर, दि. 19 MAY 2026

**संदर्भ** :- १) मा.अपर पोलीस महासंचालक,प्रशिक्षण व खास पथके,म.रा.मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशि/पो.शि. भरती-प्रक्रिया/२०२४-२०२५/२२/२०२५ , दि.२७/१०/२०२५

२) या कार्यालयाकडील दि.२८/१०/२०२५ रोजी वर्तमानपत्रात/संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली जाहिरात.

३) मा.अपर पोलीस महासंचालक,प्रशिक्षण व खास पथके,म.रा.मुंबई यांचेकडील पत्र क्र.अपोमसं/ प्रशिक्षण/ कार्यपध्दती २०२४-२५/२२/२०२५, दि.१९/०१/२०२६

**विषय:- पोलीस शिपाई भरती-२०२४-२०२५**
**पोलीस शिपाई पदावर नियुक्तीबाबत..**

---ooo---

**आ दे श:-**

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम 2011 व शासन पत्र गृहविभाग क्रमांक आरसीटी-0312/प्र.क्र.228/पुनर्बांधणी-166/पोल-5अ, दिनांक 07/01/2016 अन्वये व संदर्भाधिन पत्रात नमुद प्रमाणे दिनांक 11/02/2026 रोजी पासुन पोलीस आयुक्त,सोलापूर शहर आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाची सरळ सेवा भरती आयोजित करण्यात आली होती. खालील उमेदवारांना जिल्हा शल्यचिकीत्सक, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,सोलापुर यांनी **"पोलीस शिपाई"** या पदासाठी वैद्यकिय दृष्टया पात्र असल्याचे घोषित केल्यामुळे व खालील नमुद उमेदवार हे राहत असलेल्या घटकाकडुन चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाले असुन त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह नोंदी आढळुन येत नसलेबाबत कळविल्याने महाराष्ट्र शासन, गृह विभाग,मुंबई यांचे कडील आदेश क्र. आरसीटी-0311/प्र.क्र.228/पोल-5अ, दिनांक 16 जुन, 2011 मधील तरतुदींनुसार त्यांना **"पोलीस शिपाई"** अस्थायी या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे. त्यांना सातव्या वेतन आयोगाचे वेतन स्तर S-7, रु.21700-69100/- व देय असणारे इतर भत्ते त्यांना कर्तव्यास रुजु झाले दिनांकापासून अनुज्ञेय होतील. खालील उमेदवारांनी राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण यांचेकडे त्वरित रुजु व्हावे.

| अ.क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नांव व पत्ता | जन्म दिनांक | जात | निवड प्रवर्ग | सुरुवातीचे वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 521 | ब्रम्हदेव रामचंद्र शिंदे रा.आंबे ता.पंढरपूर जि.सोलापूर | 26/03/1997 | मराठा | खुला सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतनरु.750/- |
| 02 | 1440 | विष्णु शांतीनाथ आसबे रा.चोखामेळा नगर,मंगळवेढा जि.सोलापूर | 27/06/1999 | मराठा | खुला सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 03 | 1111 | अनिकेत अनिल यादव रा.गोंडगाव ता.बार्शी जि.सोलापूर | 29/07/2003 | मराठा | खुला सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नांव व पत्ता | जन्म दिनांक | जात | निवड प्रवर्ग | सुरुवातीचे वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| 04 | 3030 | अनुराधा तुकाराम नवले रा.घेरडी ता.सांगोला जि.सोलापूर | 21/09/2005 | माळी | खुला महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 05 | 1108 | पंकजसिंग प्रकाशसिंग ठाकुर रा.राणा कॉलनी,बार्शी ता.बार्शी जि.सोलापूर | 13/10/1999 | रजपूत | खुला सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 06 | 325 | संजय दत्तात्रय वाघमोडे रा.कोळेगांव ता.मोहोळ जि.सोलापूर | 06/11/2002 | धनगर | खुला सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 07 | 2781 | संजना राजु भोसले रा.27/20,रविवार पेठ जोशी गल्ली,सोलापूर | 02/12/2002 | गोंधळी | खुला महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 08 | 2807 | वैभवी धर्मेंद्र गवळी रा.मुळेगांव ता.दक्षिण सोलापूर जि.सोलापूर | 19/09/2003 | मराठा | खुला महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 09 | 2947 | मंजुळा भगवंत गवळी रा.बंधारपाडा ता.दिंडोरी जि.नाशिक | 15/12/2003 | कोंकणा | खुला महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 10 | 94 | प्रथमेश विठठल पाटील रा.बोराळे ता.मंगळवेढा जि.सोलापूर | 09/07/2003 | लिंगायत | ईडब्ल्युएस सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 11 | 75 | सागर विष्णु कोकाटे रा.बेंबळे ता.माढा जि.सोलापूर | 01/11/2002 | मराठा | एसईबीसी सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 12 | 429 | विष्णु रामचंद्र शिंदे रा.आंबे ता.पंढरपूर जि.सोलापूर | 17/11/2002 | मराठा | एसईबीसी सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 13 | 423 | शंभु लक्ष्मण पाटोळे रा.वैरागवाडी ता.माढा जि.सोलापूर | 12/10/1996 | मराठा | एसईबीसी सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 14 | 784 | शरद भाऊराव शेळके रा.कोन्हेरी ता.मोहोळ जि.सोलापूर | 14/06/2003 | मराठा | एसईबीसी सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 15 | 2835 | श्रध्दा श्रीकांत पाटील रा.कात्यायनी वसाहत,बालिंगे ता.करविर जि.कोल्हापूर | 25/05/2006 | मराठा | एसईबीसी महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 16 | 1011 | विशाल महादेव जाधव रा.भंडीशेगांव ता.पंढरपूर जि.सोलापूर | 27/09/1999 | माळी | इमाव सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 17 | 1359 | प्रथमेश संजय क्षिरसागर रा.पाटकूल ता.मोहोळ जि.सोलापूर | 14/01/2003 | माळी | इमाव सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 18 | 1336 | दिपक सोन्याबापू ढगे रा.हराळवाडी ता.मोहोळ जि.सोलापूर | 27/07/2001 | लोणारी | इमाव सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 19 | 676 | वैभव ब्रम्हानंद मठ रा.प्लॉट न.20, स्वागत नगर कुमठा नाका,सोलापूर | 09/07/2001 | जंगम | इमाव सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 20 | 884 | महेश महादेव सुतार रा.वैराग ता.बार्शी जि.सोलापूर | 21/12/1994 | सुतार | इमाव सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 21 | 2892 | नंदिनी अंकुश धायतिडक रा.काळेगांव ता.बार्शी जि.सोलापूर | 24/04/2005 | कुणबी | इमाव महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नांव व पत्ता | जन्म दिनांक | जात | निवड प्रवर्ग | सुरुवातीचे वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| 22 | 3119 | विदया दत्तात्रय काळे रा.गुळपोळी ता.बार्शी जि.सोलापूर | 22/07/2002 | माळी | इमाव महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 23 | 2788 | गायत्री महादेव लेंगरे रा.वडवळ ता.मोहोळ जि.सोलापूर | 09/08/2005 | वाणी | इमाव महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 24 | 3107 | रोहिणी बाळु इंगळे रा.मांजरगाव ता.करमाळा जि.सोलापूर | 06/07/2002 | कुणबी | इमाव महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 25 | 739 | कृष्णा भागवत गिते रा.रंगारगल्ली माधव टॉकिजसमोर,संगमनेर ता.संगमनेर जि.अहिल्यानगर | 22/07/2000 | वंजारी | भ.ज-ड सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 26 | 2870 | रुपाली संजय सानप रा.महालक्ष्मी हिवरे ता.नेवासा जि.अहिल्यानगर | 18/09/2004 | वंजारी | भ.ज-ड महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 27 | 769 | समाधान राजाराम गोसावी रा.कोन्हेरी ता.मोहोळ जि.सोलापूर | 24/08/2001 | गोसावी | भ.ज-ब सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 28 | 1317 | सचिन सिद्राम धुमाळ रा.तळेहिपरगा ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर | 04/06/2004 | कुडमुडे जोशी | भ.ज-ब सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 29 | 122 | आकाश सुरेश भोई रा.मिरी ता.मोहोळ जि.सोलापूर | 07/04/1998 | झिंगा भोई | भ.ज-ब सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 30 | 2742 | वैशाली रामचंद्र देशमुख रा.नंदिवाले वसाहत उदगांव ता.शिरोळ जि.सोलापूर | 05/01/1999 | नंदीवाले | भ.ज-ब महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 31 | 2737 | हर्षला रघुनाथ शिंदे रा.बामणी ता.सांगोला जि.सोलापूर | 26/08/2003 | नाथपंथी डावरी गोसावी | भ.ज-ब महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 32 | 2866 | छाया संभाजी दुधावडे रा.वनकुटे पो.कोटे ता.संगमनेर जि.अहिल्यानगर | 15/08/2005 | ठाकर | अ.जमाती महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 33 | 2846 | दिपाली सोमा सुपे रा.हातविज ता.जुन्नर जि.पुणे | 15/02/2002 | कोळी महादेव | अ.जमाती महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 34 | 2908 | अश्विनी सुरेश चव्हाण रा.सावकी ता.कळवण जि.नाशिक | 15/06/2005 | कोंकणा | अ.जमाती महिला | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 35 | 225 | दादाजी पंडित चौधरी रा.भिमखेत ता.सटाणा जि.नाशिक | 04/06/1997 | कोंकणा | अ.जमाती सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |
| 36 | 197 | शिवम बालाजी साळुंके रा.प्लॉट न.402,समर्थ रेसिडेन्सी,न्यु संतोष नगर,विजापूर रोड,सोलापूर | 17/07/1996 | ठाकर | अ.जमाती सर्वसाधारण | रु.21700/-विशेष वेतन रु.750/- |

**अटी व शर्ती**

१. वरील नमुद उमेदवारांच्या नियुक्त्या चारित्र्य व वर्तणुकीची पडताळणी, जातीचे दाखले,शैक्षणिक दाखले,प्रकल्पग्रस्त दाखला व भरुन दिलेल्या साक्षांकन नमुना पडताळणीच्या अधिन राहुन करण्यात आलेली आहे. सेवेत नियुक्त झाल्यानंतर पुन्हा अशा कोणत्याही घटना निष्पन्न झाल्यास वा साक्षांकन नमुन्यामध्ये दिलेली माहिती ही खोटया स्वरुपाची,वा मुददाम म्हणून दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास व गुन्हयामध्ये शिक्षा वा दंड झाल्याचे निदर्शनास आल्यास तुम्हांस सेवेतून कमी करण्यात येईल.

Anucampa/order

Scanned with OKEN Scanner

२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपूर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०/१/२०१९ अन्वये पोलीस शिपाई या पदावर ७ वा वेतनआयोग स्तर S-७ रु.२१७००-६९१०० या वेतनश्रेणीत किमान टप्प्यावर वेतन व त्यावर देय असलेले भत्ते अनुज्ञेय होतील.

३. शा.नि.सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०१२/१६, दि.१२/१२/२०११ अन्वये ज्या उमेदवाराची निवड मागासप्रवर्गात झालेली आहे अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाले दिनाकांपासून सहा महिन्याचे आंत त्यांचे जात प्रमाणपत्राची संबधित जात पडताळणी समिती कडून पडताळणी करुन घ्यावी. नियुक्ती स्विकारताच जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी कामी आवश्यक कागदपत्रे त्वरीत या कार्यालयास सादर करावीत. जात पडताळणी समितीने जात वैधतेबाबतचा दावा अवैध ठरविलेस त्यांचे नियुक्ती आदेश रद्द करुन त्यांचे विरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग ( जात प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी विनियमन)अधिनियम २००० यातील तरतूदीच्या अधिन राहून त्यांचे विरुध्द कारवाई करण्यांत येईल.

४. तुम्हांस देण्यात आलेली नियुक्ती ही तात्पुरती व हंगामी स्वरुपाची असून तुम्हांस कोणत्याही प्रकारची नोटीस अथवा पुर्वसुचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

५. आपणांस महाराष्ट्र नागरी सेवानियम मुंबई पोलीस अधिनियम-१९५१ व मुंबई पोलीस नियमावली १९५९ मुंबई पोलीस (शिक्षा वअपील) नियम १९५६ मधील तरतूदी तसेच शासन वेळोवेळी जे नियम अंमलात आणेल त्यातील तरतूदी लागू होतील.

६. पोलीस भरतीच्या वेळी आपण सादर केलेली शिक्षण वय धर्म जात इत्यादी बाबतची प्रमाणपत्रे पोलीस पडताळणी मध्ये किंवा सेवाकालावधीत केव्हांही खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा आपले पुर्व चारित्र्य व वर्तणूक चांगली नसल्याचे आढळून आल्यास किंवा साक्षांकन नमुन्यात दिलेली माहिती खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल. आपण भरतीच्या वेळी घोषित केलेली जात/प्रवर्ग आपणांस सेवाकालावधीत बदलता येणार नाही.

७. आपणास आपल्या पदाचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास आपणांस नियुक्ती प्राधिकरणास १ महिन्याची नोटीस द्यावी लागेल अथवा १ महिन्याच्या नोटीसांच्या बदल्यात १ महिन्याच्या पगारा एवढी रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे प्रथम भरावी लागेल. तसेच आपल्या विरुद्ध कोणतीही चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित असता कामा नये अथवा शासकिय देणी बाकी असता कामा नयेत. राजीनाम्या नंतर पुनर्नियुक्तीचा विचार केला जाणारनाही.

८. आपल्या सेवापुस्तक किंवा सेवापटात नोंदविलेल्या जन्मतारखेत फेरबदल करावयाचा असल्यास महाराष्ट्र नागरी सेवा(सेवेच्या सर्वसाधारणशर्ती) नियम १९८९ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या तारखे पासून ५ वर्षाच्या कालावधीत योग्य त्या पुराव्यांसह सक्षम प्राधिकरणा मार्फत शासनाकडे अर्ज करावा लागेल.५ वर्षाच्या कालावधी नंतर केलेल्या अर्जावर विचार केला जाणार नाही.

९. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक. अनिओ-२००५/ १२६/ सेवा-४ दि.३१/१०/२००५ अन्वये दि.**०१/११/२००५** व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचा-यांना"पारिभाषीक अंशदान निवृत्तीवेतन योजना"लागू राहील व म.ना.से.(निवृत्तवेतन ) नियम **१९८२** व महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी नियम **१९५९** लागू राहणार नाही.

१०. पोलीस शिपाई यापदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीला मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्या पासून सुट मिळालेली नसेल तर मराठी व हिंदी भाषा परिक्षा त्यासंबंधित केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

११. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवा प्रवेश) नियम २०११ मधील नियम १२ नंतर नव्याने नियम १३ **(संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे.)** अंतर्भुत करण्यात आला आहे. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण - २०००/ प्र.क्र/६१/२००१/३९ मंत्रालय मुंबई दिनांक १९/०३/२००३ नुसार सदरील पदासाठी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा उमेदवार याची सेवा समाप्त होईल.

१२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवा प्रवेश) नियम २०११ मधीलनियम ३(१)(ड) नुसार पोलीस शिपाई पदाकरीता मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम २ (२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना



Scanned with OKEN Scanner

धारण केलेला असणे आवश्यक आहे. परंतु सदर परवाना धारण न करण्या-या उमेदवाराने नियुक्ती नंतर त्याचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्या वर ०२ वर्षाच्या आत परवाना धारण करण्यात येईल व त्या कालावधीत परवाना धारण न केल्यास सदर उमेदवाराचे निवड रदद ठरविण्यात येईल.

१३. पोलीस शिपाई पदावर उमेदवारास या घटकांत नियुक्ती देण्यात आलेली आहे. या घटकाव्यतिरिक्त इतर पोलीस घटकात त्यांची बदली करता येणार नाही.

१४. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/१२ दिनांक २८ मार्च २००५ अन्वये लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन ( लहान कुटुंब म्हणजे पती व पत्नी यासह दोन मुले ) भरुन देणे आवश्यक आहे.

१५. महाराष्ट्र शासन गृह विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील क्रमांक पीएसबी ०३११/प्र.क्र.५२१/पोल-५अ दिनांक २६/०९/२०२१ अन्वये तुम्ही प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षाच्या आत पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास अथवा सदर पदावरुन कार्यमुक्त करणेबाबत विनंती केल्यास तुमच्या प्रशिक्षणावर झालेला खर्च तसेच प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्त्यासह रक्कम वसूल करण्यात येईल.

१६. पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांनी पोलीस शिपाई पदासाठी विहीत केलेले प्रशिक्षण पुर्ण करणे आवश्यक आहे. संबंधीत परिक्षा चार संधी मध्ये त्यांनी उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. जर चार संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. सदर कालावधीत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

१७. प्रशिक्षण केंद्रातील मुलभूत व प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सोलापूर शहर पोलीस दलाच्या आस्थापनेवरील कोणत्याही ठिकाणी / विभागात अथवा पोलीस मुख्यालय येथे तुम्हांस कर्तव्यास नियुक्त करण्यात येईल.

१८. वरील उमेदवारांची नेमणुक ही तात्पुरत्या स्वरुपात असून नियमानुसार अनुज्ञेय असलेले पोलीस प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण करणे आवश्यक आहे. प्रशिक्षण कालावधीमध्ये समाधानकारक प्रगती नसल्यास प्रशासकीय कारणास्तव त्यांची सेवा कोणतेही कारण अगर नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

१९. वर नमुद उमेदवारांनी पोलीस मुख्यालय सोलापूर शहर येथे राखीव पोलीस निरीक्षक यांना दिनांक **२१/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा.** पर्यंत प्रतिवेदन दयावे. प्रशिक्षणास येताना आवश्यक ते साहित्य सोबत आणावे. प्रशिक्षणाच्या कालावधीत कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. त्याचप्रमाणे पोलीस मुख्यालयाचा परिसर सोडून बाहेर जाता येणार नाही. प्रशिक्षणार्थींनी मेस अग्रीम ॲडव्हान्स म्हणून रु. ५०००/- (पाच हजार रु.) प्रथम जमा करणे आवश्यक आहे.

२०. प्रशिक्षण कालावधीतील उमेदवारांची शिस्त ही अत्यंत उच्च दर्जाची राहील याची दक्षता घ्यावी. वरिष्ठांनी वेळो-वेळी दिलेल्या आदेशाचे पालन कसोशिने होईल याची दक्षता बाळगावी. सदर प्रशिक्षण कालावधीत गैरशिस्तीचे वर्तन व असभ्य वर्तणूक आढळून आल्यास त्वरीत सेवेतून कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

19/5/2026

**( एम.राज कुमार )**
**पोलीस आयुक्त,सोलापूर शहर.**

प्रति वरील नमुद उमेदवार

प्रत : - राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय सोलापूर शहर ( दोन प्रतिमध्ये )

२/- वरील उमेदवार हे कर्तव्यावर हजर झाल्याबाबतचा अहवाल दिनांकासह या कार्यालयास सादर करावा.सदरील उमेदवारांना योग्य तो सरकारी सरंजाम व साहित्य आदा करण्यात यावे.त्याचप्रमाणे दिलेल्या सुचनांप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

प्रत :- प्रमुख लिपीक कक्ष-३ ( ०२ प्रती / पोलीस नोटीस,सोलापूर शहर.

Anucampa/order

Scanned with OKEN Scanner